ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३९ पुणे, बुधवार, ७ फेब्रुवारी, १९७३ अंक ३


## आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



## त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

729 Mar

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा.

**वाढीव भाग-भांडवलावर १० टक्के डिव्हिडंड**

**सन १९७२ मधील गौरवास्पद प्रगती**

**ठेवीमध्ये रु. ४.३२ कोटींची वाढ**

सातारा येथील युनायटेड वेस्टर्न बँकेने सन १९७२ मध्ये अतिशय चांगली प्रगती केलेली असून ऑडिटपूर्व ताळेबंदानुसार दि. ३१ – १२ – १९७२ अखेर बँकेच्या ठेवीत रु. ४·३२ कोटींची वाढ होऊन त्या रु. २१·९० कोटीवर गेलेल्या आहेत. ठेव वाढीप्रमाणे २५ टक्के पडते.

बँकेच्या वसूल भाग-भांडवलात सन १९७२ मध्ये रु. ५ लाखाची वाढ होऊन देखील बँकेच्या संचालक मंडळाने गेल्या वर्षाइतकेचे म्हणजे १० टक्के डिव्हिडंड देण्याची शिफारस केलेली आहे. बँकेचे वसूल भांडवल आता रु. ३८·१३ लाख झाले आहे.

ऑडिटपूर्व नफातोटा पत्रकानुसार बँकेच्या नफ्यातही वाढ झाली असून राखीव निधीकडे रु. २ लाख वर्ग केले आहेत. यामुळे आता राखीव निधी रु. १६·५० लाख झाला आहे बँकेच्या सेवकवर्गासही सन १९७२ करिता ८⅓ टक्के बोनस बँकेने जाहीर केला आहे.

सन १९७२ मध्ये बँकेच्या कर्जव्यवहारातही बरीच म्हणजे रु. २·५१ कोटींची वाढ होऊन तो वर्षअखेर रु. १३·२८ कोटीचेवर गेला आहे.

बँकेने सन १९७२ मध्ये विदर्भामध्ये नागपूर, अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ, मलकापूर व खामगाव या ७ ठिकाणी आपल्या नवीन शाखा उघडल्या आणि वर्षअखेर तिच्या एकूण ६१ शाखा झालेल्या आहेत. आता विदर्भातील भंडारा व चंद्रपूर हे दोन जिल्हे सोडल्यास बँकेच्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत शाखा आहेत ही अभिमानाची बाब होय. या दोन जिल्ह्यांत देखील चालू साली शाखा उघडण्याचा बँकेचा विचार आहे.

सन १९७२ मधील बँकेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची व अभिमानाची गोष्ट म्हणजे सातारा येथे बँकेच्या हेड-ऑफिसच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन तिचे उद्घाटन भारताचे उपराष्ट्रपती, मा. डॉ. गोपाळस्वरूप पाठक यांच्या हस्ते व केंद्रीय अर्थमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि. ५ जानेवारी, १९७३ रोजी मोठ्या थाटात झाले.


बँकेच्या सन १९७२ मधील गौरवास्पद प्रगतीबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत असून त्याबद्दल बँकेचे अध्यक्ष, संचालक व सेवकवर्ग यांचे अभिनंदन होत आहे.

---


**अर्ज करताक्षणी टेलिफोन : १९८६ पर्यंत थांबा**

सध्या टेलिफोन मिळविण्यासाठी कित्येक वर्षे वाट पहावी लागते; १९८६ नंतर कुणालाही अर्ज करताक्षणी टेलिफोन मिळू शकेल; 'वेटिंग लिस्ट'चे कारणच उरणार नाही, असे त्या खात्याच्या उपमंत्र्यांनी पणजी येथील आपल्या भाषणात सांगितले. तोपर्यंत सर्व टेलिफोन ऑटोमॅटिक एक्स्चेंजवर आलेले असतील.

---

इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.



कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ तार : IVwpijoay

☆ अर्थ ☆

बुधवार, ७ फेब्रुवारी, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## शेतीच्या उत्पादनात वाढ हीच आर्थिक प्रगतीची गुरुकिल्ली

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. कॉलिन क्लार्क ह्यांनी दिल्ली येथे भारताच्या आर्थिक विकासावर भाषण केले. ते म्हणाले की, सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी शेतीच्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे हा एकच उपाय आहे. शेतीचे उत्पादन वाढले तर अन्नधान्याच्या किमती कमी होतील आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांत उत्पादन होणाऱ्या मालाच्या किमतीवरही परिणाम होईल व त्या उतरण्यास मदत होईल. अर्थातच उत्पादनाच्या खर्चात घट होईल. त्याचा परिणाम होऊन अर्थव्यवस्थेच्या औद्योगिक व सेवाविभागांची रोजगार उपलब्ध करून देण्याची पात्रताही वाढीस लागेल. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी भारताने अधिक प्रमाणावर रासायनिक खतांचा वापर केला पाहिजे. रासायनिक खतांचे देशातील उत्पादन वाढविण्यात आले पाहिजे. परंतु पुरेशा प्रमाणात ते वाढत नाही तोपर्यंत रासायनिक खतांची आयात मोठ्या प्रमाणावर करण्यात यावी. देशाच्या परदेशीय चलनाच्या साठ्यावर कितीही ताण पडला तरी शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांची आयात करण्यात आलीच पाहिजे. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा विभाग हा सर्वात मोठा आहे, आणि म्हणूनच देशाच्या आर्थिक प्रगतीची किल्ली ह्या विभागाकडे योग्य लक्ष देण्यात गुंतलेली आहे. ह्या विभागातील उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने निश्चित उपाययोजना आजपर्यंत केलेली नाही. अमेरिकेचे भारतामधील माजी वकील प्रा. गालब्रेथ ह्यांनी रासायनिक खताला दुसऱ्या प्रकारची पर्यायी जमीन म्हटले आहे, ते बरोबर आहे.

भारत सरकारने गरीब शेतकऱ्यांना अल्प किमतीत खताचा पुरवठा केला पाहिजे. ज्या ठिकाणी पाण्याचा अपुरा पुरवठा आहे अशा ठिकाणीही खते वापरण्यात आली तर पिकांचा संपूर्ण नाश टाळता येतो असा अनुभव आहे. देशातील ४० टक्के लोक दारिद्र्याच्या अगदी खालच्या पातळीवर आहेत. अशा लोकांत शेतमजुरांचा समावेश आहे. अशा भूमिहीन मजुरांना देण्यात येणारी किमान मजुरी ठरविण्यात आली पाहिजे. त्याशिवाय ज्यांना स्वतःच्या मालकीची जमीन नाही अशा शेतमजुरांत जमिनीची फेरवाटणी करण्यात आली पाहिजे. परंतु असे करण्यापूर्वी शेतमजुरांना शिक्षण देण्यात आले पाहिजे. मेक्सिको देशात त्यांना शिक्षण देण्याची दक्षता घेण्यात आली नाही. त्याचा परिणाम असा झाला की शेतीच्या उत्पादनात घट झाली. सहकारी शेतीच्या प्रयोगामुळे दुष्काळ पडण्याची भीती आहे. १९३३ साली रशियात सहकारी शेतीमुळे दुष्काळ पडला व १९६१ साली चीनमध्येही असाच अनुभव आला. तथापि ट्रॅक्टर्सचा वापर आणि पीकसंरक्षणासाठी करण्यात येणारे औषधांच्या फवाऱ्यांचे उपाय ह्या बाबतीत सहकार्य करण्यास हरकत नाही. परंतु शेतकऱ्यांना ह्या सोयी उपलब्ध करून देण्याचे कार्य खाजगी मालकीच्या संघटनांकडे सोपविण्यात यावे. ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या लोकांचा ओघ थांबविण्यासाठी ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची पसरण करण्यात आली पाहिजे. ग्रामीण भागांतील लोकांना त्यांच्या घराजवळच रोजगार मिळू लागला तर शहराकडे येण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीला हळूहळू आळा बसू लागेल. भारताच्या आर्थिक प्रगतीत सर्वात मोठा अडथळा म्हणजे त्यावर राजकारणाची पडलेली असह्य छाया आहे.

---

## अमेरिकेच्या विमानदलाचे मर्यादित यश

व्हिएटनाममध्ये गेली काही वर्षे चाललेल्या युद्धाचा शेवट दृष्टिपथात आला आहे. ह्या युद्धात दक्षिण व्हिएटनामच्या लष्कराला अमेरिकेच्या विमानदलाने सतत व जोरदार पाठिंबा दिला होता. लंडनमधील लष्करी तज्ज्ञांनी अमेरिकन विमानदलाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. ते म्हणतात की, दीर्घकाल चाललेल्या ह्या युद्धात अमेरिकन विमानदलाला कोठलाही निर्णायक विजय मिळविता आला नाही. पण कम्युनिस्ट लष्कराला विजय मिळू न देण्याचे कार्य मात्र विमानदलाने केले. शत्रूच्या पुरवठ्याच्या मार्गांची विमानदलाने जबरदस्त नासाडी केली. त्याला युद्धसाहित्य मिळण्यात अतिशय अडचणी निर्माण केल्या. शिवाय अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी कम्युनिस्ट लष्कराच्या बळालाही मर्मग्राही तडाखे लगावले. परंतु व्हिएटनाममधील युद्ध मुख्यतः गनिमी काव्याचे होते. लपूनछपून आलेल्या संधीचा फायदा घेण्यात गनिमी सैनिक तयार केलेले असतात. त्यांच्या हालचालींना केवळ विमानांच्या हल्ल्यांनी पायबंद घालणे अशक्यच होते. अमेरिकन विमानदलाला ह्या कामी यश आले नाही. शिवाय उत्तर व्हिएटनाममधील शहरवासी नागरिकांच्या मनोधैर्याला हादरा देण्याचेही विमानदलाला फारसे जमले नाही. ग्रामीण भागातील जनताही चिकाटीने लढतच राहिली. तथापि व्हिएटनाममधील जनता कडव्या लष्करी शिस्तीची होती म्हणूनच तिला हे जमले. अमेरिकेने आपले विमानदल मुक्त हस्ताने वापरले नसते तर दक्षिण व्हिएटनाम उत्तर व्हिएटनामच्या लष्कराने निश्चितपणे काबीज केला असता, ह्यात शंका घेण्याचे कारण नाही.

## शहरांतून उंच उंच इमारती न बांधण्याचा सल्ला

मुंबईसारख्या मोठ्या लोकवस्तीच्या शहरांतून राहाण्यासाठी जागा मिळणे दुरापास्त झाले आहे. इमारती बांधण्यासाठी जागा पुरेशी नाही. अशा स्थितीत २२–२३ मजल्यांच्या उंच इमारती बांधून बिऱ्हाडांच्या जागा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न होत आहेत. ह्या प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी दिल्ली येथे आर्किटेक्ट, इंजिनिअर्स, शहरसंयोजक आणि बांधकामतज्ज्ञ ह्यांची एक परिषद भरविण्यात आली होती. परिषदेने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की मोठ्या शहरांतून गगनचुंबी उंच इमारती फार मोठ्या प्रमाणावर बांधणे योग्य होणार नाही. शहरांतील राहत्या जागांची टंचाई कमी करावयाची असेल तर चार ते पाच मजल्यांच्या इमारती बांधण्यास प्राधान्य देण्यात आले पाहिजे. कारण अशा इमारतींना लिफ्टसारख्या सोयीची गरज भासत नाही. कमी उत्पन्नाच्या गटांतील लोकांना राहाण्याच्या जागा देण्यासाठी प्रयत्न व्हावयास पाहिजेत. पण उंचउंच इमारती हे ह्या प्रश्नाचे उत्तर नाही. देशांतील बहुसंख्य लोक कमी उत्पन्न असणाऱ्या गटांतील आहेत. त्यांना राहाण्याच्या जागा तावडतोब उपलब्ध करून दिल्या नाहीत तर हा प्रश्न आवाक्याच्या बाहेर जाईल. सध्या मोठ्या शहरांतून खूप गर्दी झाली असून ती आणखी वाढतच चालली आहे. आणखी २५ ते ३० कोटी लोक मोठ्या शहरांत सामावून घेणे अशक्य आहे. त्यांची व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र नवीन शहरेच वसवावी लागतील.

---

## आहारात संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते

जपान ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनने एका आगळ्या विषयासंबंधी बोलपट घेऊन तो दूरचित्रवाणीवर दाखविण्याचे ठरविले आहे. हा बोलपट निरनिराळ्या देशांतील लोकांच्या आहाराविषयीचा असून त्याचे चित्रीकरण १२ देशांत करण्यात येणार आहे. कॉर्पोरेशनचे तीन तंत्रज्ञ भारतात येणार असून येथील आहारा-विषयी बोलपट तयार करतील. बोलपटाचे नाव 'भारत : मसाल्याची भूमि' असे ठेवण्यात येणार आहे. आहारात मसाल्याच्या पदार्थांचे स्थान काय आहे ते बोलपटात दाखविले जाईल. मसाला हा पदार्थ युरोपखंडात पैदा होऊ शकत नाही. काही वर्षांपूर्वीच्या शालेय पाठ्यपुस्तकांतून मसाल्यांच्या पदार्थांचा व्यापार करण्यासाठी युरोपिअन दर्यावर्दी भारतात येत असा मजकूर असे. त्यावरून युरोपच्या व आशिआच्या संस्कृतीत मसाल्याच्या पदार्थांमुळे परिवर्तन होऊ घातलेले दिसते. जपानचे कॉर्पोरेशन जो बोलपट तयार करणार आहे, त्यात माणसाच्या आहारात मसाल्याच्या पदार्थांमुळे कसा फरक होत गेला ते इतिहासदृष्ट्या दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अन्नाचा व संस्कृतीचा संबंध दाखविणाऱ्या बोलपटांच्या मालिकेंपैकी तो एक असेल. ह्या मालिकेतील बोलपटांचे चित्रीकरण आतापर्यंत फ्रान्स, स्वित्झरलंड, इंग्लंड, पश्चिम जर्मनी, इत्यादी देशांत झालेले आहे. लोकांची पाकनिष्पत्ती आणि आहाराच्या सवयी ह्यांत त्यांच्या संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते असा बोलपट निर्मात्यांचा दावा आहे. भारतामध्ये घेण्यात येणाऱ्या बोलपटाचे काही चित्रण मुंबईत व काही कोचीन येथे करण्यात येणार आहे.

---

## एम. सी. एम. जाहिरात एजन्सी कंपनीची योजना

जाहिरात एजन्सीच्या क्षेत्रात मास कम्युनिकेशन अँड मार्केटिंग प्रायव्हेट लि. ह्या कंपनीने आता तिसरा अनुक्रम पटकाविला असून संपूर्णपणे भारतीय मालकीच्या कंपन्यांत ती पहिल्या अनुक्रमाची बनली आहे. तिचा वार्षिक धंदा २·५ कोटी रुपये झाला आहे. कंपनीच्या जाहिरातदारांची वार्षिक उलाढाल २,००० कोटी रु. आहे. कंपनीचे वसूल भागभांडवल सध्या फक्त ३·५ लक्ष रु. आहे, ते २२ लक्ष रु. करण्यात यावयाचे आहे. त्यांपैकी ९ लक्ष रु. चे भाग कंपनीच्या ४० वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्याची कंपनीची योजना आहे. हे भाग त्यांना खरीदता यावेत ह्यासाठी कंपनी त्यांना कर्ज देईल. जाहिरात एजन्सीचा धंदा करणाऱ्या कंपनीला एका महिन्याच्या उलाढाली इतका पैसा सहजी हाताशी असायला हवा, असे ह्या कंपनीचे चेअरमन, श्री. दिलीप एस. डहाणूकर ह्यांनी सांगितले.

---

## पंजाब नॅशनल बँक लि. औद्योगिक क्षेत्रात उतरणार

दि पंजाब नॅशनल बँक लि. च्या बॅंकिंगच्या धंद्याचे १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण झाले आणि तिच्या २ कोटी वसूल रुपयांच्या भागांचे पोटी तिला ८·७० कोटी रु. रोख्यांचे स्वरूपात आणि १·५ कोटी रोखीने भरपाई मिळाली. ह्या बँकिंग कंपनीच्या भागांची बाजारातील किंमत १९७२ मध्ये रु. २३ ते रु. ३० एवढी होती. राष्ट्रीयीकरणानंतर तिने ७,००० भागधारकांना प्रत्येक भागावर रु. ५·४० डिव्हिडंड दिले आहे. भागधारकांना देऊ केलेली रोख रक्कम भागांच्या बाजारभावापेक्षा जास्त आहे. ज्यांना रोख रक्कम हवी असेल त्यांचे भाग बँकिंग कंपनीच विकत घेईल. कंपनी केरळमध्ये खताचा कारखाना आणि इतर राज्यांत नायलॉन धाग्यांचा कारखाना व इलेक्ट्रिक आर्क फरनेस उभारणार आहे.

---

## बँकांचे 'सर्व्हिस चार्जेस'

एका मोठ्या बँकेने घरगुती वापराच्या उपकरणांच्या खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जाची जाहिरात वाचून एक शानदार पोशाख केलेला, सुशिक्षित दिसणारा, गृहस्थ बँकेत आला आणि त्याने रेफ्रिजरेटरसाठी कर्ज मागितले. बँकेच्या अधिकाऱ्याने कर्जाची योजना त्याला समजावून सांगितली आणि म्हटले, "कर्जावर १०% व्याज द्यावे लागेल. बँकेचे 'सर्व्हिस चार्जेस' २% होतील." त्या गृहस्थाने विचारले, "मी विकत घेणार असलेल्या रेफ्रिजरेटरच्या सर्व्हिसिंगसाठी बँकेचा मेकॅनिक दर महिना येणार का दर पंधरा दिवसांनी येणार?" २% हा आकार कर्जखात्याच्या सर्व्हिसिंगचा आहे; कर्जदाराने घेतलेल्या उपकरणाच्या सर्व्हिसिंगचा नाही, हे त्याला पटवून देण्याला कितीतरी वेळ लागला.

# व्यवस्थापनातील समस्या (५)

## कुणाचा कुणाला मेळ नाही

लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.

मे. फॅशन्स प्रा. लि. या विख्यात रेडिमेड वस्त्रांच्या कंपनीचे मॅ. डायरेक्टर एस्. नामदेव हे धंद्याच्या भवितव्याबाबत काळजीत पडले होते. श्री. नामदेव हे एक कसबी शिंपी होते. १९६८ साली त्यांनी परदेशात जाऊन तेथील गारमेंट फॅक्टरीज पाहून मोठ्या उत्साहाने फॅशन्स प्रा. लि. ही कंपनी काढली. भारतात तयार कपड्यांचा व्यवसाय वाढतच होता. शिलाईचे दर वाढत असल्याने गोरगरिबांना तयार कपडे परवडत होते. तसेच टेरिलिन, टेरिकॉट, या जातीच्या महाग कापडाचे उत्पादन वाढून त्यांनाही गिऱ्हाईक वाढते होते. मोठ्या शहरांतून आधुनिक पद्धतीचे तयार शर्टस्, पँटस् व तरुणींचे पाश्चात्य पद्धतीचे पोशाख, स्लॅक्स, स्कर्टस, वगैरेंना मागणी चांगली होती. फॅशन्स लि. ने दरवर्षी नवीन ब्रँडचे विविध प्रकारच्या कापडाचे रेडिमेड कपडे बाजारात आणले व ते चांगले पॉप्युलर ठरले. श्री. नामदेव यांनी जर्मनीतून आधुनिक यंत्रे आणून कपड्यांचे उत्पादन व विविधता सतत वाढती ठेवली. जसजसा धंद्याचा व्याप वाढला तसतसा नोकरवर्ग, अधिकारी वर्गही वाढला. कंपनीचा नवीन कारखाना ठाण्यास स्थापण्यात आला. मुख्य कचेरी व सेल्स ऑफिस फोर्ट विभागातच ठेवण्यात आले. आयात केलेल्या मशिनरींसाठी कारखान्यावर निर्यातीचे बंधन सरकारने घातले. त्यासाठी श्री. नामदेवांना परदेशी बाजारपेठांचा अभ्यास व गिऱ्हाइकांशी बोलणी करण्यासाठी वारंवार परदेशी जावे लागले. सुदैवाने त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन त्यांना एक्स्पोर्ट ऑर्डर्सही चांगल्या मिळत गेल्या. भारतीय कापड व मजुरी स्वस्त असल्याने परदेशी बाजारपेठेत फॅशन्स कंपनीचे दर मंजूर होत. कपड्यांची फॅशन मात्र प्रत्येक ऑर्डरला गिऱ्हाइकांचे आवडीनुसार बदलावी लागे. त्यामुळे डिझाईन्स व प्रॉडक्शनसाठी लागणारे साचे, टेम्प्लेटस यासाठी कंपनीला बराच खर्च करावा लागे आणि या गोष्टी वेळेवर हाती न आल्यास उत्पादनाला विलंब होण्याची भीती असे.

१९७१ च्या जानेवारी महिन्यात श्री. नामदेव यांनी आपल्या सर्व अधिकाऱ्यांची एक संयुक्त बैठक प्रथमच बोलावली. एकमेकांच्या परस्परांबद्दल फार तक्रारी होत्या आणि त्यांचे निवारण करणे श्री. नामदेवांना आवश्यक वाटले. पण त्यांना स्वतःला उद्योगव्यवस्थापनाचा फारसा अनुभव नसल्याने व रोजच्या समस्या निराळ्या आढळत गेल्याने त्यांनी एका व्यवस्थापन सल्लागाराचा— श्री. मित्रा यांचा—सल्ला घेण्याचे ठरविले. परदेशात असे सल्लागार सर्रास नेमण्यात येतात असे श्री. नामदेवांच्या लक्षात आले होते. श्री. मित्रा यांच्या सांगण्यावरून त्या अधिकाऱ्यांच्या बैठकीतील संभाषण त्यांच्या नकळत टेप करून घेण्यात आले, त्याचा गोषवारा खाली दिला आहे.

श्री. थॉमस–प्रॉ. मॅनेजर : "सर, मला असे वाटू लागले आहे की माझ्यावर परत एखादी टेलरिंग फर्म काढण्याची पाळी येणार आहे. आपण मला आपला जुना विश्वासू कामगार म्हणून नव्या कंपनीत बढती देऊन प्रॉडक्शन मॅनेजर बनविले. परदेशी पाठवून आधुनिक तंत्र व यंत्र कसे वापरावे हे शिकण्याची संधी दिली. पण गेली २ वर्षे आपण घेतलेल्या देशी-व विदेशी ऑर्डर्स पुऱ्या करता करता माझी फजिती होत आहे. वर्षाचे बारा महिने व दिवसाचे बारा तास मी येथे असतो, पण माझे मलाच समाधान मिळत नाही.

आता हेच पाहा. येत्या उन्हाळ्यासाठी आपण जाळीदार 'आरपार' शर्ट काढणार आहोत. आपले सेल्स मॅनेजर सेलवाणी यांनी केवळ्या जाहिराती देऊन ठेवल्या आहेत, मी सर्व टेम्प्लेटस्, पंचेस तयार ठेवले आहेत. तीन नवीन कटर्स नेमले आहेत पण त्यांना काम नाही म्हणून कंटाळून ते बहुधा पुन्हा कोठेतरी शिंपी म्हणून दुकाने थाटतील व अशी माणसे आपल्यास जाहिरात देऊनही लवकर मिळणार नाहीत. मी शर्ट शिवायचे म्हणून शेड्यूल ठरविले पण अजून मुख्य कापडाचाच पत्ता नाही. खरेदी खात्याने जेवढी सँपल्स आणली, त्यातले एकही आमच्या इन्स्पेक्शनला पास ठरत नाही. जे मिळते आहे त्याचेच शर्ट शिवा म्हणतात. म्हणजे, हे आरपार शर्ट कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे तुटतील. कोण हे शर्ट घेणार ? आपल्या सांगण्यावरून आजपयत आम्ही मालाचा दर्जा राखीत आलो आहोत पण यापुढे असाच दबाव येत राहिला व निकृष्ट माल वापरला तर कंपनीचे नाव राखणे निदान मला तरी जड जाईल. साधा शिलाईचा दोरासुद्धा एक दर्जाचा आम्हांला मिळत नाही. कच्ची शिलाई गिऱ्हाइकांच्या पसंतीस कशी उतरेल ? प्रॉडक्शन सुरू होण्याअगोदरच सेलवाणी काय माल आज पाठवणार याचा तगादा सुरू करतात आणि मग त्या घाईत स्वस्त मालाच्या खोक्यात महाग माल भरला गेला तर तपासायलाही आम्हांला फुरसत मिळत नाही. नियमित व पद्धतशीर काम कसे द्यावे हेच कळत नाही.

परचेसचे श्री. खरीदकर व श्री. सेलवाणी यांना फोर्ट ऑफिसला फोन केला तर तास तास हे जागेवर नसतात. हेड ऑफिसकडून आमचा कोठलाच प्रॉब्लेम लवकर सुटत नाही. इथे ठाण्यात आम्ही जंगलात पडलो आहोत व बारीक सारीक गोष्टींसाठी आम्हांला मुंबईला माणूस पिटाळावा लागतो. परवाचीच गोष्ट, जकात नाक्यावर आलेला माल सोडवायला आमच्याकडे पैसे नव्हते धावपळ करून आम्हांला जकातीची रक्कम उभी करावी लागली तेव्हा प्रॉडक्शन चालू झाले. आम्हांला किमान महिनाभर चालेल एवढे मटेरियल स्टॉकमध्ये असल्याशिवाय सेल्सने कोणाला शब्द देऊ नये. आम्ही त्याला जबाबदार राहणार नाही."

श्री. सेलवाणी— "सर, आम्ही मार्केटमध्ये हिंडून ऑर्डर्स

मिळवायच्या की प्रॉडक्शन आपल्या हातात पुढल्या महिन्यात काय देईल याची वाट पहात बसायची ? असे केले तर आमचे आरपार शर्ट लोकांना पावसात अंग भिजवायला उपयोगी पडतील किंवा आणखी उशीर झाला तर थंडीत मच्छरदाणी म्हणून अंगावर घ्यायला होतील. गेल्या वर्षी थंडीत कॉटस्वूलचे शर्ट वेळेवर न आल्याने आमचा लाखाचा धंदा हातचा गेला. शिवाय आम्ही जो माल डीलरना देतो त्याचा किती परत हाती घ्यावा लागेल हे सांगता येत नाही. गेल्या वर्षी निळ्या शर्टना पिवळी कफबटणे लागली म्हणून आलेल्या तक्रारींना अजून उत्तरे पाठवीत आहे. जाहिरात, पॅकिंग, सेल्समनना ट्रेनिंग, ही कामे मला करताच येत नाहीत कारण प्रॉडक्शन वेळेवर सॅम्पल देत नाहीत. प्रॉडक्शन प्रोग्रॅमची आम्हांला खात्री देत नाहीत. काही वेळेला आम्ही डीलरकडून अॅडव्हान्स आणतो पण त्यांना मालच देत नाही. निदान १० डीलर्स तरी आम्ही यामुळे गमावून बसलो आहो. जोपर्यंत आपण निश्चित काय माल आम्हांला देणार हे अगोदर कळत नाही तोपर्यंत एक्स्पोर्ट धंदा वाढविणेही धोक्याचे आहे असे वाटते. एक्स्पोर्टच्या नादाने आपण किती सँपल्स तयार केली आणि प्रत्यक्ष एक्स्पोर्ट किती झाला याची आकडेवारी पाहण्यासारखी आहे. आपले बरेचसे एक्स्पोर्ट मार्केट आपण तिथल्या बदलत्या फॅशनशी स्पर्धेत मागे पडल्याने गेले आहे. ''

"भारतात वाढत्या करामुळे महाग रेडिमेड कपडे घेणारे अपेक्षेप्रमाणे वाढत नाहीत. आपण कॉटनचे स्वस्त कपडे काढले तर मला वाटते वर्षभर चांगला सेल मिळेल. नायलॉन, टेरिलिन यांच्या रिजेक्शनमुळे आपले फार नुकसान होते. आपले कामगार अडाणी आहेत. बरेच वेळा चुकीने मशीन चालवून माल बिघडवतात व तो चिंधीच्या भावाने विकणे मला फार वाईट वाटते. एक निश्चित पॉलिसी ठरविण्याची वेळ आली आहे. माझे डीलर्स कंपनीवर नाराज होऊ लागले आहेत. मे. स्टाईल लि. आपले मार्केट मारीत आहे याची मला जाणीव असूनही हातात माल नसल्याने मला गप्प बसावे लागते. श्री. खरीदकरांनी जलद पावले उचलून कच्च्या मालाची व्यवस्था केली नाही तर हा पसारा संभाळणे जड जाईल. ''

श्री. खरीदकर– " सर, मला श्री. थॉमस व श्री. सेलवाणींच्या अडचणींची पूर्ण कल्पना आहे. माझे प्रयत्नही चालू आहेत. पण ते पैशाच्या अभावी जरा तोकडे पडत आहेत. टेरिलिन, टेरिकॉट कापडांना बाजारात खूप मागणी आहे व मिलच्या दुकानांतून तसेच व्यापाऱ्यांकडून त्याची विक्री जोरात असते. तेव्हा आपल्याला उधारीवर व एकदम नवीन डिझाईनचे कापड देण्यास मिलवाले तयार नसतात. मुंबईच्या मिलमध्ये तर उशिरा बिले देण्याबाबत आपण इतके प्रसिद्ध आहोत की आपल्यासाठी स्वतंत्र कापड काढायला किंवा रंगवायला कोणीच तयार नाही. दरही जास्त सांगतात. त्यामुळे मला कलकत्ता, कोईमतूर, अमदाबाद, येथे सारखे फिरावे लागते सेलवाणींपेक्षा माझा प्रवासखर्च गेल्या वर्षी जास्त झाला असेल. पण काय करू ? कारखाना चालू ठेवण्यासाठी काही वेळा आम्ही दुसरीकडचा साधारण नमुन्याप्रमाणे माल आणू पाहतो तर थॉमसना १००% नमुन्याशी जुळेल असाच माल हवा. प्रत्येक मिलचा रंग सुद्धा सारखाच असत नाही. तसेच मालाचे इंडेंट काढताना नक्की किती मीटर कापड लागेल याचा अंदाज नसतो. गेल्या वर्षी हजार शर्ट तयार झाले पण खिशांना कापड कमी पडले व तसेच कापड पुन्हा मिळेना. आमची काय परिस्थिती झाली असेच आम्हालाच माहीत.''

" जेव्हा मी घरी असतो तेव्हा रात्रीबेरात्री सप्लायर्सचे फोन येतात. बिले देणे माझ्या हातात नसूनही ते ऐकत नाहीत. उद्या आम्हांला त्यांच्याचकडून माल आणायचा असल्याने फोन बंदही करता येत नाही. माझ्या बायकोने तर फोनची धास्ती घेतली आहे. वेळीअवेळी लांबलांबचे लोक फोन करतात तेव्हा तिला हातातील काम सोडून फोन घ्यावा लागतो व भाषेची अडचण असल्याने लोक काय सांगतात ते निरोपही धड घेता येत नाहीत. माझ्या घरचा फोन कंपनीने काढून टाकावा अशी माझी विनंती आहे. ''

श्री. तिजोरीवाला, अकौंटंट– " सर, आपण ज्या तऱ्हेने धंदा वाढवीत आहोत त्याला भांडवल फार कमी पडते आहे. आपली वसुली चार-चार महिन्यांतही होत नाही आणि सप्लायर्स मात्र महिना दीडमहिन्यात वसुलीला उभे राहतात. नवी मशिनरी आयात करण्यात आपल्याला बरेच कर्ज झालेले आहे आणि त्यामुळे व्याज व हप्ते यांची देणी वेळेवर भागवणे जड होत आहे. आपण काय विकणार व त्यात भाव ठरवताना किती नफा मिळवू शकणार याचे गणित एकदा नक्की करून द्या, नाहीतर खर्च वाढतो आहे आणि जमा दिसत नाही. आता आपले कर्जही थोडे मर्यादेपलीकडे वाढत आहे. सर्वांनी याचे भान ठेवून आपल्या खर्चाचे कार्यक्रम आखावे म्हणून हे सर्व मला सांगावे लागले. असेच व्यवहार चालले तर माझ्या तिजोरीत रोख रकमेऐवजी सप्लायरची बिले व नोटीसाच मला सांभाळाव्या लागतील ''

श्री. मित्रांनी टेपरेकॉर्डर बंद केला व ते श्री. नामदेवांशी चर्चा करू लागले. त्यांनी श्री. नामदेवांना काय सांगितले असावे ?

---

## अमेरिकेला आशिआई डॉक्टरांचा पुरवठा

१९७० मध्ये १३,३०० परदेशी शास्त्रज्ञ, डॉक्टर्स आणि इंजिनिअर्स ह्यांना अमेरिकेत घेण्यात आले. १९६९ चे मानाने ही संख्या २०% ने अधिक आहे तर १९६५ च्या मानाने अडीच पट आहे. अमेरिकेत दरसाल सुमारे ३,००० परदेशी डॉक्टर्स रोजगारासाठी जातात. १९७२ मध्ये भारतामधून १,५१३ डॉक्टर्स गेले; त्या खालोखाल ७८२ डॉक्टर्स फिलिपाइन्स-मधून गेले.

## उष्णोदकाच्या झऱ्यांपासून विजेची निर्मिती

दिल्ली विद्यापीठाने हिमालयाची 'भूस्तर रचना' ह्या विषयासंबंधी परिसंवाद भरविला होता. ह्या परिसंवादात भाग घेण्यासाठी पृथ्वीच्या पोटातील उष्णतेचा अभ्यास करणारे अनेक तज्ज्ञ आले होते. हे तज्ज्ञ आणि संयुक्त राष्ट्र संघटनेचे एतद्‌विषयक तज्ज्ञ ह्यांच्या साह्याने उष्णोदकाचे झरे असलेल्या जागी विजेची निर्मिती करण्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यात आला. उष्णोदकाचे झरे असलेली ठिकाणे सध्या मुख्यतः आरोग्य-स्नानासाठी वापरण्यात येतात. तथापि, त्यांचे अस्तित्व पृथ्वीच्या आतील थरात असणारी उष्णता दर्शविते ह्यात शंका नाही. दिल्ली येथे जमलेल्या तज्ज्ञांनी अशी माहिती सांगितली की इतर काही देशांनी ह्या उष्णतेचा उपयोग करून वीज निर्माण करण्याचे तंत्र अवगत केले असून काही देशात तर दरसाल ४०० मेगॅवॅट वीज उष्णोदकाच्या झऱ्यांच्या जागी खोल असणाऱ्या उष्णतेचा उपयोग करून निर्माण करण्यात येत आहे. भारतात शक्तीच्या ह्या उगमाचा अद्याप फारसा विचारच करण्यात आलेला नाही. हिंदमध्ये अशा प्रकारचे उष्णोदकाचे झरे सुमारे ७० ठिकाणी आढळून येतात. त्यांपैकी ४० ठिकाणे हिमालयाच्या आसमंतात आहेत. बाकीची देशभर विखुरलेली आहेत. अर्थात ह्या सर्वच झऱ्यांच्या जागी वीज उत्पन्न करता येईल असे नाही. तज्ज्ञांच्या मताने हिमालयाच्या आसमंतातील उष्ण झऱ्यांपैकी ८५ टक्के ठिकाणी अशी वीज निर्माण करता येईल. इतर ठिकाणांपैकी ६५ टक्के ठिकाणेच ह्या कामासाठी योग्य आहेत. ३७ अंश सेंटिग्रेड उष्णतामान असेल तर त्या झऱ्याला उष्णोदकाचा झरा म्हणतात.

---

## संस्कारित अन्नपदार्थांची मागणी घटली

महाराष्ट्र ॲग्रो-इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कसबेकर ह्यांनी नागपूर येथील संत्रा बागाइत संघाने चालविलेल्या कारखान्याला भेट दिली. हा कारखाना नादारीत निघालेला असून तो चालविण्यासाठी कॉर्पोरेशनने ताब्यात घेतला आहे. भेटीच्या वेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, संस्कारित अन्नपदार्थांची बाजारपेठ एकंदरीने संकुचित होत चालली आहे. गिऱ्हाइकांकडून येणारी मागणी घटत चालल्यामुळे डबाबंद अन्नपदार्थ तयार करणारे अनेक कारखाने बंद पडले आहेत अगर बंद पडण्याच्या बेतात आहेत. सध्या देशात सर्वत्रच अर्थव्यवस्था मंदावली असल्याने ग्राहकांकडून संस्कारित अन्नपदार्थांना यावी तशी मागणी येत नाही. तथापि कॉर्पोरेशनचा कारभार समाधानकारक चालला आहे. रशियाकडून व अमेरिकेकडून १४० टन आंब्यांच्या पदार्थांची मागणी आली होती. आंब्यांच्या गेल्या हंगामात कॉर्पोरेशनने ३६० टन आंब्यांचे संस्कारित पदार्थ तयार केले. आंब्यांप्रमाणेच संत्र्यांच्या बाबतींतही समाधानकारक उत्पादन होत आहे. संस्कारित अन्नपदार्थांची अधिक चांगली जाहिरात करणे आवश्यक असून कॉर्पोरेशन आता ह्या बाबीकडे विशेष लक्ष पुरविणार आहे. श्री. कसबेकर ह्यांनी बाजारपेठेत आलेल्या मंदीचे अधिक विश्लेषण केलेले नाही. परंतु ते सहज सुचण्यासारखे आहे. संस्कारित अन्नपदार्थांची मागणी मुख्यतः शहरांतील लोकांकडून येत असते. गेल्या काही महिन्यातील महागाईने त्रस्त झालेले शहरातील लोक आपल्या जवळील पैसा अधिक तातडीच्या गरजांवर खर्च करू लागलेले आहेत.

---

## आरोग्यप्रद भौतिक परिस्थितीचा फायदा फार थोड्यांना

भारत सरकारच्या शास्त्र व तंत्र खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनी दिल्ली येथे स्वच्छ व आरोग्यप्रद भौतिक परिस्थितीविषयीच्या एका परिसंवादाचे उद्घाटन केले. त्या वेळी उद्घाटनाचे भाषण करताना ते म्हणाले की, भारतामधील शहरांतून राहणाऱ्या लोकसंख्येपैकी अवघ्या एकतृतीयांश लोकांना सांडपाण्याच्या निचऱ्याच्या म्हणजेच ड्रेनेजच्या सोयी उपलब्ध आहेत. एकूण लोकसंख्येपैकी ७ टक्के लोकांनाच ह्या आरोग्यप्रद सोयींचा फायदा मिळतो, असा ह्याचा अर्थ आहे. देशातील लोकांपैकी ३० टक्के लोकांना पाण्याच्या तीव्र टंचाईला अजूनही तोंड द्यावे लागत आहे. पाण्याची टंचाई तर आहेच पण त्याचा दर्जाही समाधानकारक नसतो. भारतात सध्या अनेक ठिकाणी भूभौतिक परिस्थिती निकृष्ट दर्जाची दिसून येते. त्याला कारण मनुष्य स्वभावातील दोष आणि कारभारविषयक अनास्था ही आहेत. ही परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न सरकार आपल्याकडून करीत आहे. परंतु अखेर लोकांनी सक्रिय सहकार्य दिले तरच सुधारणा घडवून आणता येणे शक्य होईल. सरकार पाण्याच्या प्रदूषणाबद्दलचा कायदा करीत आहे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांना परवाने देताना त्यांनी प्रदूषण टाळण्याची काय सोय केली आहे ह्याची चौकशी करण्यात येते. त्याबाबतच्या उपायांचा आग्रह धरण्यात येतो. तरीही कानपूरमधून वाहणारी गंगा, असनसोल—दुर्गापूर भागातून वाहणारी दामोदर नदी आणि कलकत्त्यामधील हुगळी ह्या नद्यांतून काठावरील गावांतील सांडपाणी आणि कारखान्यांतील दूषित पाणी मोठ्या प्रमाणावर सोडण्यात येत असतेच.

---

## माणिकशांच्या बॅटनसाठी तयारी

फील्ड मार्शल सॅम माणिकशा ह्यांच्यासाठी सुयोग्य बॅटन (छडी) तयार करण्यात लष्करी खाते गुंतले आहे; ग्रेट ब्रिटन, फ्रान्स इत्यादी देशांकडून नमुने मागविण्यात आले आहेत. भारताच्या पहिल्या फील्ड मार्शलचे बॅटन त्याच्या दर्जाला शोभेल अशा आकाराचे आणि रूपाचे बनविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. ग्रेटब्रिटनच्या फील्ड मार्शलच्या बॅटनला सुमारे २० हजार रुपये खर्च येतो.

# खोट्या नाण्यांचीच चलती

लेखक : गि. के. पंडित, एम. ए., एलएल. बी., ए. सी. एस.

अर्थशास्त्रामध्ये ग्रेशमचा कायदा सुविख्यात आहे. Bad coins throw good coins out of circulation. बदचाल खोटे नाणे किंवा बनावट नोट आपल्याजवळ आल्यास काहीही करून ती आपण खपविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे खोटी नाणी व्यवहारात उपयोगात येऊ लागतात व त्याबदली चांगली नाणी पडून राहातात.

उद्योगधंद्यामध्ये किंवा व्यवसायामध्येसुद्धा व्यक्तींच्या बाबतीत हाच कायदा अनुभवास येतो. प्रामाणिकपणाने व निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्ती अप्रामाणिक व निष्ठाहीन व्यक्तींच्या मार्गात आल्यास त्या चांगल्या व्यक्ती नकोशा होतात व काहीही करून त्यांची उचलबांगडी केली जाते.

एका मोठ्या कन्स्ट्रक्शन कंपनीत 'क्ष' हा सुपरवायझिंग एंजिनीअर म्हणून काम करत होता. 'क्ष' हा अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू अशा वृत्तीचा होता. पण त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांत काम चुकवणारे व खोटेपणाने वागणारेच अधिक होते. कामगारांची खोटी हजेरी ठेवणे, ओव्हरटाईम कामाचा हिशेब ठेवताना कामाचे तास वाढवून ते पैसे वाटून घेणे, रात्रपाळीमध्ये झोपा काढणे इत्यादी प्रकार सर्रास चालू असत. 'क्ष' ने कामाचा ताबा घेण्यापूर्वी जे इंजिनिअर होते त्यांनी स्वतःचा बंगला बांधला, गाडी घेतली व नंतर स्वतंत्र धंदा काढण्याच्या निमित्ताने नोकरी सोडली व त्यांच्या जागी 'क्ष' आला. आपल्या हाताखालील लोकांची लबाडी व खोटेपणाचे वर्तन पाहून 'क्ष' ला चीड आली व हे सर्व प्रकार बंद करून कंपनीच्या पैशाचा दुरुपयोग थांबवावा या हेतूने त्याने सर्व प्रयत्न केले. रात्रपाळीस तो स्वतः जाऊ लागला तेव्हा बाकीचे लोक त्याला 'साहेब, तुम्ही कशाला जागत बसता, आम्ही सगळं बघतो. तुम्ही निवांत झोपा' असे सांगू लागले व पूर्वीचे साहेब रात्री फक्त एकदा येऊन जात तसेच करा, असा सल्ला देऊ लागले. पण 'क्ष' ने आपली वृत्ती बदलली नाही; त्यामुळे रात्रपाळीची खोटी हजेरी, काम न करता झोपणे इत्यादी गैरप्रकारांस सोकावलेल्या नोकरांस 'क्ष'च्या कर्तव्यतत्परतेचा अनिवार त्रास होऊ लागला व तो त्यांच्या डोळ्यांत सलू लागला. त्याला कामाला सहकार्य द्यावयाचे नाही; उलट, कामात घोटाळे करून ठेवावयाचे, नसत्या अडचणी धोकत बसावयाचे, यामुळे काम रेंगाळू लागले. त्यामुळे मुख्य एंजिनीयरनी 'क्ष' ला जाब विचारल्यावर 'क्ष'ने सर्व सत्य परिस्थिती साहेबास सांगितली, पण कोणत्याही परिस्थितीत काम वेळेवर झालेच पाहिजे असे साहेबांनी ठणकावले व 'तुम्हास जबाबदार धरले जाईल' असे बजावले. 'क्ष'च्या स्वाभिमानी वृत्तीस ते न मानवून त्यांनी राजीनामा दिला व लागलीच त्यांच्या जागी दुसरा एंजिनीयर आला. तो अप्रामाणिक, स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेणारा असल्यामुळे त्याच्या हाताखालचे लोक खूष राहिले व कंपनीचे काम 'पहिल्यासारखे' चालू झाले व मुख्य एंजिनीयरना आपल्याला योग्य मनुष्य मिळाल्याचे समाधान लाभले व त्यास स्पेशल प्रमोशन दिले.

सामान्यतः सगळीकडे हा ग्रेशमचा कायदा दिसून त्यास सर्वव्यापी स्वरूप प्राप्त झालेले दिसेल. खोट्या नाण्यांचीच चलती !

---

### बँकेला फसविण्याच्या आरोपावरून दोघांना अटक

मुंबईच्या पोलिसांनी एका खासगी कोचिंग क्लासचे व्हिजिटिंग लेक्चरर डॉ. गजानन मंगेश रेगे आणि करिअर फिल्म्स अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटचे 'भागीदार' श्री. सुदर्शनकुमार लुथ्रा ह्यांना बतावणी करून फसवणूक केल्याच्या आरोपावर अटक केली. त्यांची प्रत्येकी ५,००० रु. जामिनावर सुटका झाली आहे.

— डॉ. रेगे ह्यांनी बँक ऑफ इंडियाच्या हिंद राजस्थान बिल्डिंग मधील शाखेत चालू खाते "कांत माधव, असोसिएटेड सिने-इक्विपमेंट कंपनी ऑफ पूना" ह्या नावाने उघडले. श्री. लुथ्रा ह्यांनी वरील फर्मकडून सिनेमाची काही उपकरणे खरीदण्यासाठी मागितलेल्या कर्जाच्या पोटी सिंडिकेट बँकेने 'अॅडव्हान्स' म्हणून २५,११६ रु. ची पे ऑर्डर दिली. पुण्याच्या ह्या 'फर्म'ची मुंबई येथे कचेरी नाही आणि ह्या 'फर्म'ने दिलेला पत्ता ज्या एका व्यापारी कंपनीचे श्री. लुथ्रा हे भागीदार होते, अशा कंपनीचा पत्ताच 'फर्म'ने बँकेस दिलेला होता असे बँक ऑफ इंडियाचे एजंट श्री. एन. के. भाटिया ह्यांना आढळून आले. त्यांनी "कांत माधव"ला स्वतः तोच असल्याचे सिद्ध करण्यास सांगितले. एवढ्यात एजंटाने पोलिसांना बोलाविले आणि डॉ. रेगे व श्री. लुथ्रा ह्यांना अटक झाली.

---

### पाच वर्षे तुरुंगवास भोगल्यानंतर बँक कर्मचारी निर्दोषी ठरला : नोकरीवर परत रुजू होण्याची वाट पाहात आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर्धा शाखेमध्ये श्री. जे. पी. मोकाशे हे काम करीत होते. फेब्रुवारी, १९६७ मध्ये एक बनावट ड्राफ्ट करून त्याचे पैसे घेतल्याच्या आरोपावरून त्यांना ५ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. परंतु मुंबई हायकोर्टाने त्यांचेवरील कोणताच आरोप सिद्ध होत नाही असे ठरविले. दरम्यान श्री. मोकाशे ह्यांची ५ वर्षांची शिक्षा भोगूनही झाली होती ! स्टेट बँकेत पुनः दाखल केले जाण्याची आणि बुडालेली बढती मिळण्याची ते आता वाट पहात आहेत. स्वतःला आणि कुटुंबीयांना झालेल्या मानसिक यातनांबद्दल भरपाई मागण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांच्या मुक्ततेसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी एकूण १२,००० रुपये खर्च केले. वकील फी व कोर्ट खर्च ह्यास ७,००० रुपये लागले आणि ५,०००. रु वर्धा येथील पोलिसांकडे फौजदारी केस काढून घेतली जाईल, ह्या कल्पनेने भरले होते. ही रक्कम परत मिळण्याची श्री. मोकाशे ह्यांना आशा वाटत आहे. श्री. मोकाशे ह्यांचे वडील सेवानिवृत्त शिक्षक आहेत

## उंचीची ठेंगूपणावर मात

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत, फार थोडे अपवाद वगळता, दोघांपैकी उंच असलेला उमेदवारच गेल्या ७० वर्षांत निवडून आलेला आहे. उंच लोकांना झाडांच्या फांद्यांखालून कधीकधी वाकून जावे लागते किंवा लहान मोटारीत गैरसोयीने बसावे लागते, पण व्यवहारी जगात तेच यशस्वी होतात. पिट्सबर्ग विद्यापीठाच्या पाहणीप्रमाणे, उद्योगधंद्यात प्रवेश मिळणाऱ्या ठेंगण्या उमेदवारांपेक्षा उंच उमेदवारांना प्रारंभीचा पगार १२·४% जास्त मिळतो. उद्योगधंद्याच्या जगात अँन्ड्र्यू कार्नेजीसारखा यशस्वी ठेंगू विरळाच. ठेंगू तरुणांना प्रियाराधनातही मागे पडावे लागते. ठेंगू मुलीही उंच तरुणच पसंत करतात. चित्रपटातील नायकही क्वचितच ठेंगू असतो. क्रीडाक्षेत्रात उंचीचे महत्त्व स्वयंसिद्धच आहे. जॉकी मात्र ठेंगू असतात, पण रेसमध्ये जॉकीपेक्षा घोड्याचेच महत्त्व अधिक असते !

चालू शतकातील अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उंचीने ठेंगूपणावर कशी मात केली, हे खालील तक्ता दर्शवितो :—

| यशस्वी | | अयशस्वी | |
|---|---|---|---|
| १९०४ थिओडर रूझवेल्ट | ५′१०″ | पार्कर | ५′९″ |
| १९०८ टाफ्ट | ५′१०½″ | ब्रायन | ५′१०″ |
| १९१२ वुड्रो विल्सन | ५′११″ | टाफ्ट | ५′१०½″ |
| १९१६ वुड्रो विल्सन | ५′११″ | ह्यूजेस | ५′१०″ |
| १९२० हार्डिंज | ६′ | कॉक्स | ५′१०½″ |
| १९२४ कूलिज | ५′१०″ | डेव्हिस | ५′११″ |
| १९२८ हूवर | ६′ | स्मिथ | ५′११″ |
| १९३२ फ्रँकलिन रूझवेल्ट | ६′२″ | हूवर | ६′ |
| १९३६ फ्रँकलिन रूझवेल्ट | ६′२″ | लँडन | ५′११″ |
| १९४० फ्रँकलिन रूझवेल्ट | ६′२″ | विल्की | ६′२½″ |
| १९४४ फ्रँकलिन रूझवेल्ट | ६′२″ | ड्युई | ५′८″ |
| १९४८ ट्रूमन | ६′९″ | ड्युई | ५′८″ |
| १९५२ आयसेनहॉवर | ५′१०½″ | स्टीव्हनसन | ५′१०″ |
| १९५६ आयसेनहॉवर | ५′१०½″ | स्टीव्हनसन | ५′१०″ |
| १९६० केनेडी | ६′ | निक्सन | ६′ |
| १९६४ जॉन्सन | ६′२″ | गोल्डवॉटर | ५′११″ |
| १९६८ निक्सन | ६′ | हंफ्रे | ५′११″ |
| १९७२ निक्सन | ६′ | मॅकगव्हर्न | ६′ |

" तुम्ही अयशस्वी, तर मीही अपेशी "— आपले काम व्यवस्थितपणे आणि कार्यक्षमतेने करण्याचे आवाहन अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी बँक कर्मचाऱ्यांना युनायटेड बँक ऑफ इंडियाच्या कलकत्ता येथील अठरा मजली इमारतीचे उद्घाटन करतेवेळी केले. ' तुम्ही तसे करण्यात कसूर केली तर मीही अयशस्वी ठरेन, ' असे ते म्हणाले.

## ऑस्ट्रेलिआला अवर्षणाचा मोठा तडाखा

ऑस्ट्रेलिआच्या पूर्व भागाला अवर्षणाचा मोठा तडाखा बसला आहे. त्यातल्या त्यात व्हिक्टोरिआ राज्यात त्याची तीव्रता विशेषच आहे. इतिहासकालात ह्या राज्यात इतकी कोरडी हवा कधीही पडलेली नाही. उत्तरेकडच्या न्यूसाऊथ वेल्स राज्यात अनेक विस्तृत भागांत पाण्याचा मागमूसही आढळत नाही. क्वीन्सलँड राज्यातही अशीच परिस्थिती आहे. गेल्या डिसेंबर अखेरपर्यंत मेलबोर्न भागाला १० महिन्यांच्या कडक उन्हाळ्याला तोंड द्यावे लागत होते. १८५५ पासून ह्या भागातील पावसाची नोंदणी करण्यात आलेली आहे. गेल्या काही वर्षी ह्या भागात अवघा ११ इंच पाऊस पडला. नेहमीपेक्षा हे प्रमाण निम्याने कमी आहे.

## बैलादिला लोखंडाच्या खाणीपासून परदेशीय चलन

मध्यप्रदेशातील रायपूर विभागात बस्तर जिल्ह्यात बैलादिला लोखंडाच्या खाणी आहेत. यांत्रिक अवजारांच्या साह्याने लोहखनिजाचे उत्पादन करणाऱ्या आशिआखंडातील ह्या सर्वात मोठ्या खाणी आहेत. १९६८ साली ह्या खाणीतून लोहखनिज बाहेर काढण्यास प्रारंभ झाला. तेव्हापासून गेल्या डिसेंबरपर्यंत लोहखनिजाच्या निर्यातीने भारताला १०६·८ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळवून दिले आहे. परदेशीय चलन मिळविण्याच्या बाबतीत भारतामधील सर्व खाणींत ह्या खाणी अग्रेसर आहेत. १९६८ पासून डिसेंबर १९७२ पर्यंत एकूण १५२·४७ लाख टन लोहखनिज काढण्यात आले. त्यापैकी १५१·२१ लाख टन खनिज जपानला पाठविण्यात आले.

## नपुंसक तरुणांची संख्या वाढत आहे ?

स्त्रिया पुरुषांची बरोबरी करायला लागल्या आहेत, इतकेच नव्हे तर त्या पुरुषांवर मात करू पाहात आहेत, त्यामुळे तरुणांत नपुंसकत्व वाढत आहे. एकीकडे पुरुष कमजोर होऊ लागले असताना स्त्रियांची लैंगिक भूक वाढू लागली आहे. ही भूक गर्भ राहण्याच्या भीतीमुळे पूर्वी मर्यादित असे, ती भीती संततिप्रतिबंधक साधनांनी आणि गोळ्यांनी नाहीशी केली आहे. पैसे कमविण्याच्या स्पर्धेमुळे नैसर्गिक पात्रतेच्या आवाक्याबाहेरची उद्दिष्टे गाठण्याचा प्रयत्न पुरुष करू लागले आहेत. ही उद्दिष्टे गाठता आली नाहीत म्हणजेही पुरुष नपुसक होऊ लागतो — मानसिक आणि शारीरिक ताणामुळे रोमान्ससाठी त्राणच उरत नाही. खऱ्या किंवा काल्पनिक अपयशाचे नपुसकत्व हे निदर्शक आहे. ' मेडिकल अ‍ॅस्पेक्टस ऑफ ह्यूमन सेक्सच्युअ‍ॅलिटी " ह्या मासिकाने घेतलेल्या पाहणीचा हा निष्कर्ष आहे. परंतु एका तज्ज्ञाच्या मते, ' ही समस्या पूर्वीपेक्षा बिकट झालेली नाही; जागृतीमुळे मानसोपचार तज्ज्ञांकडील वर्दळ वाढली आहे, एवढेच.'

## बँकिंगच्या आघाडीवर असमाधानाचे वातावरण

गेले वर्ष बँकिंगच्या दृष्टीने असमाधानकारक गेले, असेच म्हणावे लागेल. कारण, ठेवी त्याचप्रमाणे कर्जे आणि शाखा ह्या सर्वांच्याच वाढीची गती मंदावली. प्राधान्याच्या आणि दुर्लक्षित विभागांची कर्जे ही डोकेदुखीचीच बाब कायम राहिली. लीड बँकयोजनेची प्रगती कासवाच्या गतीने चालू आहे.

१९७२ मध्ये कर्जात ३४५ कोटी रु. नी वाढ झाली; १९७१ मध्ये ५९९ कोटी रु. नी वाढ झाली होती, १९७० मध्ये ८६१ कोटी रु. नी वाढ झाली होती. कर्जपुरवठ्याची गती १९७१ मधील १३·५% वरून १२७२ मध्ये ६·९% वर आली. १९७२ मधील ठेवीतील वाढीपैकी बँका फक्त एक चतुर्थांश रकमेचाच उपकारक वापर करू शकल्या; १९७१ मध्ये ते प्रमाण एक द्वितीयांश होते. कर्जांचे ठेवींशी प्रमाण ७२·८% वरून ६६·३% वर खाली उतरले. मोठे कारखाने नवीन उपक्रम फारसे हाती घेत नाहीत; बिगर-बँकिंग क्षेत्रातून ठेवी घेण्याकडे त्यांची प्रवृत्ती वाढत आहे. राष्ट्रीयीकृत बँकांच्या भागधारकांना मिळालेल्या भरपाईचा पैसा ह्या कारखान्यांकडेच गेलेला आहे. कारखानदार कमीत कमी भांडवल वापरण्याची नवी 'तंत्रे वापरू लागले आहेत. बँका एकमेकांशी स्पर्धा करून कर्जदारांना कमी व्याजाचे आणि जास्त सोयींचे आकर्षण दाखवीत आहेत.

शेतीला दिलेल्या कर्जात वाढ झालेली नाही; अशा कर्जदारांची संख्या २ लाखांनी कमी झाली आहे. लघुउद्योगाला दिलेली कर्जेही घटली आहेत; त्या कर्जदारांची संख्या मात्र ३४,००० नी वाढली आहे. स्वतःच्याच मालकीचे व्यवसाय करणारांना दिलेल्या कर्जात वाढ झालेली दिसते; किरकोळ व्यापाऱ्यांना दिलेली कर्जेही वाढली आहेत. शेतीला दिलेल्या कर्जांच्या परतफेडीचा प्रश्न बिकट होत चालला आहे. चालू वर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे तो अधिकच बिकट होण्याचा संभव आहे.

१९७१ च्या मानाने १९७२ साली ठेवीतील वाढीची गती थोडी मंदावली आहे, त्याचे कारण स्वतःजवळील पैसा उपयुक्त मार्गाने वापरण्यात येत नसल्यामुळे ठेवींच्या वाढीचे प्रयत्न पूर्वीप्रमाणे झाले नाहीत. ठेवी ठेवणाऱ्या मध्यम वर्गाची कुवत महागाईमुळे कमी झाली आहे. बँकांची सरकारी रोख्यातील गुंतवणूक आपोआपच वाढली आहे, कारण शिल्लक पैसा व्याजी लावायलाच हवा.

१९७१ मध्ये बँकांनी १,८०१ शाखा उघडल्या होत्या; १९७० मध्ये तर २,१४१ शाखा उघडल्या होत्या १९७२ च्या पहिल्या सहामाहीत फक्त ६३५ शाखा उघडल्या होत्या.

---

## कसोटी सामना आणि नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक

नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेने आपल्या ठाणे शाखेसमोर एक स्कोअरबोर्ड उभा करून त्यावर कसोटी सामन्याची ताजी परिस्थिती दाखविणारे आकडे दाखविण्याची व्यवस्था केली आहे. मदन पत्की आणि राजीव श्रीखंडे ह्यांनी ही कामगिरी पत्करली असून त्यासाठी त्यांना प्रत्येकी दररोज २० रु. मानधन मिळेल. ह्या मानधनाच्या पैशांनी ते त्या बँकेत सेव्हिंग्ज खाते उघडतील.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BANK TO BANK...

THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT, *General Manager.*

K. B. KIRTIKAR, *Chairman.*

**रत्नागिरी आकाशवाणीची इमारत**—रत्नागिरी येथे आकाशवाणी केंद्रासाठी इमारत बांधण्यात येत आहे. तिचा पायाभरणी समारंभ ५ फेब्रुवारी रोजी झाला. इमारतीस २४ लक्ष रुपये खर्च येऊन ती तीन वर्षात पुरी होईल.

**शास्त्रज्ञाला १२·७५ कोटी रु. नुकसानभरपाई**— एका अमेरिकन कोर्टाने एका शास्त्रज्ञाला १·७ कोटी डॉलर्स ( १२·७५ कोटी रु. ) नुकसानभरपाई देवविली आहे. संशोधनासाठी एका ट्रस्टने त्याला देऊ केलेली मदत त्या ट्रस्टने मध्येच थांबविली, ह्यासाठी त्या शास्त्रज्ञाने ट्रस्टवर दावा लावला होता. अयोग्य कारणासाठी आपली ग्रँट बंद झाली, असे वाटणाऱ्यांना त्यामुळे भरपाईची वाट मोकळी झाली आहे.

**पोस्ट ऑफिस—सर्वात मोठी बँक**—भारतामधील पोस्ट ऑफिसांत २·५ कोटी लोकांच्या ठेवींची खाती असून त्यात २,४४४ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत.

**देवनागरी लिपीत चिनी शब्दकोश**— आचार्य विनोबा भावे ह्यांनी देवनागरी लिपीमधील चिनी शब्दकोश नुकताच पुरा केला आहे. ते आता देवनागरी लिपीमधील जपानी, जर्मन आणि इंग्रजी शब्दकोश तयार करण्यात गुंतले आहेत.

**५७ कोटी रु. च्या तोट्याला सबंध देशच जबाबदार**— हेवी इलेक्ट्रिकल्स लि. च्या प्रचंड तोट्याला सबंध देशच जबाबदार आहे, असे विधान उद्योगमंत्री श्री. सुब्रम्हण्यम् ह्यांनी केले आहे. १२ वर्षांपूर्वी कारखाना स्थापन झाला, तेव्हापासून त्यात गुंतविलेल्या ७७ कोटी रुपयांपैकी ५७ कोटी रुपये तोट्याने खाऊन टाकले आहेत.

**पाकिस्तानी स्त्रियांना लष्करी शिक्षण**—पाकिस्तानच्या संरक्षणविषयक तयारीचा एक भाग म्हणून पाकिस्तानी स्त्रियांना लष्करी शिक्षण देण्यास प्रारंभ करण्यात आला आहे.

**भारतीयाला ब्रिटनमध्ये अटक**—ब्रिटनमध्ये परदेशीयांना बेकायदा प्रवेश मिळवून देणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीस मदत करण्याच्या आरोपावरून बर्मिंगहॅम येथील असिस्टंट कमिशनर ऑफ इंडियाच्या कचेरीतील एका हिंदी कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे.

**मंत्र्यांच्या चपलांची चोरी**—मध्यवर्ती सरकारचे आरोग्य मंत्री उमाशंकर दीक्षित हे मद्रास येथे कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या सभेस गेले होते, परंतु बाहेर पडताना त्यांच्या चपला चोरीस गेल्याचे त्यांना आढळले. ते चपलांच्या दुकानात अनवाणी गेले व घाईघाईने चपला खरेदून निघून गेले.

**विकास योजना स्थगित केल्या** — स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापन वर्षानिमित्त खास विकास योजना चालू करण्यात आल्या होत्या त्या दुष्काळी परिस्थितीमुळे स्थगित करण्यात आल्या आहेत. ह्या योजनांवर आता नवा खर्च केला जाणार नाही.




बँकेच्या धनवर्धिनी ठेव योजनेतील एक योजना

निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यावसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेडयुल्ड बँक

महाराष्ट्रात सर्वत्र शाखा

माधवी, सातारा.

स्थापना १९११

माकडछाप



म्हणजेच

काळी टूथपावडर

नोगी आणि कंपनी प्रा. ली.
मुंबई ६१ ओ. अस.

सोल सेलींग एजन्टस्

नोगी सेल्स् कॉर्पोरेशन

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर,

MARATHI




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)